श्री राम चंद्र मिशन®

India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY



# चेन्नई

## शिष्यवृत्ती प्रशिक्षण कार्यक्रम, भारतासाठी (१६ ते २४ एप्रिल)

पूज्य गुरुदेवांनी शिष्यवृत्ती प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन सोहळ्यात तसेच सांगता समारंभातही भाग घेतला. उद्घाटनाच्या वेळी दिलेल्या भाषणात ते म्हणाले, "सहजमार्ग अभ्यासाचे सर्वात मुख्य अंग म्हणजे प्राणाहुती होय. माझ्यावर विश्वास ठेवा, प्राणाहुती ही प्रशिक्षणाची प्रक्रिया आहे, तुम्हाला जीवन देण्याची ही एक प्रक्रिया आहे (प्राणस्य प्राण:). गुरुदेवांची कृपा व ऊर्जा आपल्यामध्ये संप्रेषित करण्याची देखील ही एक प्रक्रिया आहे." सांगता समारंभाच्या वेळी त्यांनी लक्षपूर्वक ऐकण्याच्या व जे काही ऐकले आहे ते आपल्या दैनंदिन जीवनात अंमलात आणण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. पूज्य गुरुदेवांनी सर्व भाषणे त्यांच्या कुटीरातून सी.सी.टी.वी. द्वारे पाहिली.

## पूज्य बाबूजी महाराजांचा महासमाधी दिवस– १९ एप्रिल २०११

पूज्य गुरुदेव सकाळी लवकर उठले आणि नाश्त्याच्या अगोदर देखील प्रशिक्षकांना सिटिंग देण्यात व इ-मेल चेक करण्यात व्यस्त होते. खरे तर सकाळच्या सत्संगाचे संचलन करण्याचा त्यांचा मानस नव्हता पण ते सत्संगाचे संचलन करणार आहेत ही वार्ता पूर्ण आश्रमभर पसरल्याचे जेव्हा गुरुदेवांच्या कानी पडले तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले व त्यांनी सत्संगाचे संचलन करण्याचे ठरविले. त्यांनी ध्यानकक्षात प्रवेश केला खरा, पण अद्याप पुष्पहार तयार नसल्याने त्यांनी ते येईपर्यंत प्रतीक्षा करण्याचे ठरविले. जवळ-जवळ १५ मिनिटे त्यांनी हारांची प्रतीक्षा केली. तोवर ते पायऱ्यांच्याजवळ बसून राहिले व पुष्पहार आल्यानंतरच पायऱ्या चढून त्यांनी लालाजी व बाबूजींच्या छायाचित्रांना ते अर्पण केले. त्यांनी यानंतर सत्संगाचे संचलन केले.

## पूज्य बाबूजी महाराजांचा जन्मदिवस समारंभ

घोषित केल्याप्रमाणे २९ एप्रिल ते १ मे २०११ या तीन दिवसांत हा सोहळा पार पडला. सकाळचा सत्संग ७.३० वाजता व संध्याकाळचा ५.३० वाजता आयोजित केला होता. जवळपास ४००० अभ्यासी यात सहभागी झाले होते. तीनही दिवशी गुरुदेवांनी सकाळच्या सत्संगाचे संचलन केले. प्रत्येक सत्संग जवळजवळ सव्वातासाचा होता आणि शेवटच्या दिवशीचा सत्संग एक तास २५ मिनिटांचा होता.

३० एप्रिलच्या पावन दिवशी गुरुदेवांनी आठ विवाह संपन्न केले. दोन भगिनींनी भजने सादर केली. गुरुदेवांनी अनेक पुस्तकांचे, ध्वनिफीती व चित्रफीतींचे प्रकाशन केले. गुरुदेवांचा नातू भार्गव याने २४ जुलैला वितरीत होणाऱ्या गुरुदेवांच्या दुर्मीळ छायाचित्रांच्या आरक्षणाची घोषणा केली. गुरुदेवांनी या छायाचित्रांचे प्रदर्शन पाहिले. आश्रमाची सैर करताना रिमझिम पावसानेही गुरुदेवांची सोबत केली.

संध्याकाळी ६:३० वाजता हैद्राबादच्या अभ्यासींनी खूप सुंदर नाटक प्रस्तुत केले. ह्या नाटकात साधकाला त्याच्या आध्यात्मिक प्रवासात करावी लागणारी निवड तसेच शंका, पूर्वग्रह, भीती, राग आणि आळसामुळे निर्माण झालेले अडथळे आणि श्रद्धा ,प्रेम, सबुरी, शिस्त आणि इच्छाशक्ती या सर्वांमुळे या अडथळ्यांवर होणारी मात इत्यादि गोष्टी दाखविण्यात आल्या होत्या. ध्यान-कक्षाच्या आध्यात्मिकतेने भारलेल्या वातावरणात या चमूने या नाटकाचे हृदयस्पर्शी सादरीकरण केले. नंतर गुरुदेवांनी त्यांच्या कुटीरात सर्व कलाकारांची भेट घेतली. दि. १ मे रोजी भगवान बुद्धाच्या जीवनावर आधारीत एक नाटक चेन्नईच्या युवा गटाने सादर केले. गुरुदेवांनी सी. सी. टी. वी. द्वारे ह्या नाटकाचा आस्वाद घेतला.


अशा प्रकारे तीन दिवसाच्या सोहळ्याची १ मे रोजी संध्याकाळी सांगता झाली खरी; पण गुरुदेवांनी केलेले आध्यात्मिक कार्य नक्कीचआपल्या सर्वांच्या हृदयात चिरकाळ टिकून राहणार आहे आणि वृद्धिंगत होणार आहे. गुरुदेव केवळ एका दिवसासाठी गायत्री या आपल्या निवासस्थानी गेले आणि ३ मे रोजी बेंगलोरला रवाना झाले.





# अडिझेस सेमिनार

बेंगलोर (३ मे ते १४ मे २०११)



गेल्या तीस वर्षात मिशनने प्रगतीची नवी शिखरे पार केली आहेत. साधना व शिकवणुकीचे मूळचे पावित्र्य टिकवून ठेऊन उत्तमरित्या सेवा देण्याकरीता गुरुदेवांनी मिशनच्या कार्यकारी मंडळाची पुनर्रचना करण्याचा व नियोजनाचा निर्णय घेतला.

गुरुदेवांनी विश्वविख्यात व्यवस्थापक व विचारवंत डॉ. इसाक अडिझेस यांची संस्थेच्या पुनर्निमाणासाठी नियुक्ती केली. सहज मार्गातील विविध क्षेत्रातील २५ अभ्यासींना निवडून त्यांना डॉ. अडिझेस आणि गुरुदेवांच्या देखरेखीखाली परम धाम येथे मार्गदर्शन करण्यात आले.

मिशनचे भविष्यातील कार्य सुधारण्यासाठी अडिझेस पद्धतीमध्ये काही बदल करून तिचा वापर भविष्यातील मिशन व त्याच्याशी संलग्न संस्थांचा आराखडा तयार करण्यात आला. खालील हेतूंवर आधारीत नवीन संस्थेची उभारणी करण्यात आली.

- साधकांना दिला जाणाऱ्या आध्यात्मिक आधाराची व्याप्ती वाढवणे.
- संस्थेअंतर्गत परस्पर सहयोग व सेवाभावाची जपणूक करणे.
- आध्यात्मिक हेतूमध्ये अडथळा न आणता एक अखंड संस्था निर्माण करणे. आणि शेवटी.
- गुरुदेवांवरील प्रशासकीय भार कमी करणे.

### या सर्व गोष्टींच्या साधक-बाधक विचाराअंती आलेले तीन महत्वाचे परिणाम -

सहजमार्गाला भविष्याकडे नेण्याकरिता कार्यकारी मंडळाची रचना करणे आणि 'जागतिक सेवा संघाची निवड', जो गुरुदेवांना त्यांचे कार्य संपन्न करण्यास मदत करेल.

सहजमार्ग सेवेच्या करारनाम्याची निर्मिती ज्यात या सर्व मुद्यांचा समावेश असेल आणि त्यावर गुरुदेवांसहित सर्व सहभागींच्या स्वाक्षऱ्याही असतील.

प्रेम आणि सेवेला पुन्हा वचनबद्ध होणे. गुरुदेव म्हणाले, "प्रेम हाच आपला मंत्र आहे, हेच आपले कार्य आहे आणि हीच आपली प्रार्थना आहे" सेवेबद्दल बोलताना ते पुढे म्हणाले, "केवळ नि:स्वार्थ सेवेतूनच आपला उद्धार शक्य आहे."

जगभरातील मिशनचे कार्य व मिशनच्या इतर संलग्न संस्थांचे कार्य सुरळीत पार पाडण्यासाठी हा संघ गुरुदेवांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली जबाबदार राहील.

## बंगलोर

गुरुदेव दुपारी २:१५ वाजता नत्रामपल्ली येथून निघून ५ वाजता क्रेस्टला पोहोचले. त्यांनी सर्वांना प्रसाद दिला व थोडावेळ आराम करून गोल्फ कार्ट मधून नवीन प्रशिक्षण इमारतीचे बांधकाम पाहण्यास गेले. नंतर त्यांनी सत्संगाचे संचलन केले.

दुसऱ्या दिवशी सकाळी सत्संगानंतर गुरुदेव गोल्फकार्टमधून जाता जाता वाटेत भेटणाऱ्या अभ्यासींशी बातचित करत होते.त्यांनी जवळ जवळ एक तास सर्वांशी गप्पा मारल्या. नंतर थोड्या वेळाने ते शहरात गेले. ५ तारखेपासून सुरु होणाऱ्या अडिझेस सेमिनारच्या व्यवस्थेची त्यांनी पाहणी केली. त्यांनी कामाच्या गुणवत्तेचे व परम धाम आश्रम येथील तयारीचे कौतुक केले.



### जागतिक सेवा संघ

| | |
|---|---|
| पी. आर कृष्णा | आध्यात्मिक कार्यक्रम विस्तार (प्रगती) |
| संजय भाटिया | अध्यक्ष, लालाजी मेमोतियल शिक्षण संस्था |
| संतोष श्रीनिवासन | आध्यात्मिक प्रशिक्षणपूर्तता |
| रिषभ कोठारी | सदस्यसेवा |
| चक श्रीप्रसाद | सतत सुधारणा |
| राजेंद्र सिंह राठोड | आध्यात्मिक सेवा, भारत |
| पाउल एम.जूल | आध्यात्मिक सेवा,पश्चिम |
| नितीन गोविला | आध्यात्मिक सेवा, पूर्व |
| विल्यम वेकॉट | आध्यात्मिक सेवा, अमेरिका |
| एन.एस. नागराज | आध्यात्मिक सेवा, सीआयएस |
| शरत हेगडे | सामाजिक प्रगती |
| सुधीर मारवा | जागतिक कायमस्वरुपी संपत्तीसेवा |
| संतोष खानजी | जागतिक कार्यसेवा |
| कमलेश पटेल | लोक-आयुक्त |


ईरोड


मालमपुआ

## तामिळनाडू मधून प्रवास

गुरुदेव बेंगलोरहून निघून दि. १४ मे रोजी कृष्णगिरीला पोहोचले. बेंगलोर व जवळपासच्या केंद्राहून तेथे आलेल्या अभ्यासींसाठी तेथे सत्संगाचे संचलन केले. गुरुदेव बरेच आनंदी दिसत होते आणि त्यांनी सत्संगानंतर काही अभ्यासींसमवेत गमतीशीर थट्टामस्करी केली. त्यानंतर ते ईरोडसाठी रवाना झाले.

दुपारी १२:३० च्या दरम्यान गुरुदेव ईरोडला पोहोचले. प्रवासाने ते थकले होते तरीही अभ्यासींना पाहून ते आनंदी व संतुष्ट दिसत होते. थोडावेळ विश्रांतीनंतर सायंकाळी ४:०० वाजता त्यांनी भोजनगृहाचे उद्घाटन केले व जमलेल्या सुमारे १००० जणांसमवेत सत्संग केला. याच वर्षी १२वी इयत्ता उत्तीर्ण झालेल्या अभ्यासींच्या मुलांना सत्संगामध्ये सामील करवून साधनेची सुरुवात करण्याची परवानगी दिली. त्यानंतर त्यांनी केंद्रप्रभारी व प्रशिक्षकांसमवेत आश्रमाच्या विस्तारावर चर्चा केली. सायंकाळी ६ वाजता गाड्यांचा काफ़िला ईरोडहून तिरुपूरच्या डी. जे. पार्क करिता रवाना झाला.

१५ तारखेला सकाळी गुरुदेवांनी २४ जुलैच्या वाढदिवसासाठी तात्पुरत्या उभारल्या जाणाऱ्या ध्यानकक्षाचे उद्घाटन केले. सकाळी ६:४० वाजता नुकत्याच बांधलेल्या वसतिगृहाचे उद्घाटन केले. त्या विस्तीर्ण इमारतीभोवती ते फिरले व उद्घाटनाकरिता पाठीमागे उभारलेल्या बाबूजींच्या छायाचित्राच्या पडद्याची त्यांनी प्रशंसा केली. त्यानंतर त्यांनी सकाळी ७:०० वाजता त्यांनी सत्संगाचे संचलन केले व पुन्हा एकदा सत्संगासाठी लवकर तयार होण्याचे आवाहन केले. त्यानंतर त्यांनी वसतिगृहाचे 'अमैथी निलयम' (शांतीधाम) असे नामकरण केले. या प्रसंगी उपस्थित असलेल्या ३००० हून जास्त अभ्यासीमध्ये केरळहून आलेले ६०० जण समाविष्ट होते.

त्यानंतर थोड्या विश्रांतीनंतर ते आनंदी मनाने जवळपासच्या केंद्रांना भेट देण्याच्या योजना करीत होते. चेन्नईच्या "लालाजी मेमोरिअल ओमेगा स्कूल" मधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्मरणिकेमध्ये छापण्यासाठी त्यांनी एक संदेश लिहिला. गुरुदेव उदात्त मनस्थितीत होते. त्यांचे या वयामध्येदेखील स्वत:च्या प्रकृतीची व वैयक्तिक गरजांची पर्वा न करता, प्रेमाने व निस्वार्थीपणे काम करणे व विचार विनिमय करणे खरोखरीच पाहण्याजोगे होते.

"वाढणाऱ्या वृक्षाकरिता पाण्याचे जे महत्व, तेच मुलांच्या करिता शिक्षणाचे आहे.

वृक्षाला पूर्णपणे विकसित होऊन उमलण्याकरिता व आपला सुगंध पसरविण्याकरिता लागतो सूर्यप्रकाश.

प्रेम म्हणजेच सूर्य होय !"

सायंकाळी गुरुदेवांनी डी. जे. पार्क मधून जुलै समारोहाच्या तयारीच्या कामावर दृष्टीक्षेप टाकण्यासाठी फेरफटका मारला. त्यांनी 'आराम वसतिगृह' पाहिले तसेच नवीन वैद्यकीय केंद्र जेथे उभारले जाणार आहे त्या जागेलाही भेट दिली. नव्या वैद्यकीय केंद्राचा नकाशा गुरुदेवांना दाखविण्यात आला. त्यांनी तो "हे माझ्याजवळच राहु द्या" असे म्हणत आनंदाने स्वीकारला. सायंकाळी ५:३० वा. त्यांनी बाहेर ३० मिनिटापेक्षा जास्त वेळ शांततेने वाट पाहत असलेल्या अभ्यासींच्या समुदायासमवेत भारलेल्या वातावरणात सत्संग संचलित केला.

१६ तारखेला सकाळी ७:०० वाजता गुरुदेव मालमपुआच्या रिट्रीट सेंटरकडे रवाना झाले. कॉटेजच्या विस्तारित भागाचे त्यांनी उद्घाटन केले, न्याहारी केली, अभ्यासींसमवेत सुदीर्घ चर्चा केली व नंतर बाहेर वाट पाहत असणाऱ्या सुमारे ५०० अभ्यासींसाठी सत्संग घेतला. दुपारी १२:४५ वाजता ते कोईंबतूरला गेले.

नाचिपालयम आश्रमात पोहोचून त्यांनी उशीरा जेवण केले आणि थोडा वेळ विश्राम केला. जमलेल्या सुमारे ६०० अभ्यासींसमवेत सायंकाळी ४:०० वा सत्संग करुन ते रात्री ८:३० ला तिरुपुरच्या डी. जे. पार्क येथे परतले.


तिरुपूर


कंगेयम्

केवळ खाजगी वितरणाकरिता

खंड ४ अंक ४ जुलै २०११

श्री राम चंद्र मिशन®

एकोज इंडिया वार्तापत्र



दिंडिगल्



त्रिची

दिनांक १७ रोजी दुपारी गुरुदेवांनी तिरुपूरपासून ३० किमी अंतरावर असलेल्या कंगेयम या स्थळाला भेट दिली. तेथील कॉटेज व नवीन ध्यान कक्षाच्या उद्घाटनप्रसंगी तेथे ज्यांची हृदये प्रेमाने भरलेली आहेत असे बरेच अभ्यासी जमले होते. गुरुदेव तेथे बसल्यानंतर अभ्यासींनी आत प्रवेश केला. सर्व जण अतिशय शांततेने बसले होते. गुरुदेवांनी तामिळ मध्ये विचारले, "एवढ्या शांततेचे कारण काय आहे?" व काही क्षणांनंतर त्यांनी स्वत:च उत्तर दिले, "याचा अर्थ प्रगती होत आहे". सायंकाळी ४:३० वाजता तेथे उपस्थित असणाऱ्या १७०० अभ्यासींसाठी सत्संग झाला व ६:३० वाजता ते डी. जे. पार्क ला परतले.

१८ मे रोजी गुरुदेव डी. जे. पार्क येथून निघून दिंडिगल् आश्रम येथे सकाळी ८:३० वाजता पोहोचले. त्यांनी तेथे ध्यानकक्षाचे उद्घाटन केले व त्याला त्यांनी "दया आश्रम" असे नाव दिले. न्याहारीनंतर उद्घाटन प्रसंगी उपस्थित असलेल्या २५० अभ्यासींसाठी सत्संगाचे संचलन केले. गुरुदेवांनी ११ वाजता दिंडिगलहून त्रिची कडे प्रस्थान केले. जाताना एका अभ्यासीने त्याना सीट बेल्ट बांधण्याची आठवण करून दिली. तेव्हा ते गमतीने म्हणाले, "तुम्हां लोकांचे चेहरे पाहून मी सीट बेल्ट बांधायचे विसरूनच गेलो." गुरुदेवांचे हे शब्द अभ्यासींना प्रफुल्लित करुन व हलकेपणाची जाणीव देऊन गेले.

गुरुदेव त्रिचीला सुमारे १ वाजता पोहोचले. या धावपळीच्या प्रवासानंतर गुरुदेवांनी थोडावेळ विश्रांतीसाठी व काही कार्यालयीन बाबींसाठी दिला. सायंकाळच्या वेळी काहीवेळा ते खुल्या अंगणात चित्रपट पाहत असत. रविवारी ते सत्संगासाठी आश्रमात गेले. एक अभ्यासी बंधु आपल्या प्रार्थनेमुळे मिळालेल्या परिणामांबद्दल एक घटना कथन करत असता गुरुदेव म्हणाले," प्रार्थना कोण करीत आहे यावर नव्हे तर त्या प्रार्थनेमध्ये किती आर्तता आहे यावर प्रार्थनेचा परिणाम अवलंबून असतो." मुलांनी सत्संगानंतर एक छोटासा कार्यक्रम केला. २३ तारखेला गुरुदेव सकाळी ११ वाजता विमानाने चेन्नईला रवाना झाले.

## ओमेगाच्या मुलांसोबत सतखोल येथे

२७ मे रोजी गुरुदेव दिल्लीला पोहोचले. लालाजी मेमोरिअल आंतरराष्ट्रीय ओमेगा स्कूल च्या १२वी पास झालेल्या पहिल्या गटाला गुरुदेवांसोबत सतखोलचा प्रवास करण्याची संधी मिळाली होती. प्रवासासाठी नोंदणी केलेली सर्व मुले दिल्ली येथील आर. के. पुरम आश्रम येथे २८ मे रोजी पोहोचली. दिल्ली आश्रमासाठीच्या प्रस्तावित जागेलादेखील गुरुदेवांनी भेट दिली.

दुसऱ्या दिवशी, रविवारी, मुले गुड़गाव आश्रमामध्ये गुरुदेवांनी घेतलेल्या सत्संगाला उपस्थित होती. सत्संगानंतर अभ्यासींनी मुलांना जिव्हाळ्याचे प्रतीक म्हणून छोटिशी अभ्यासी–दैनंदिनी व पेन अशी भेट दिली. त्या संध्याकाळी गुरुदेवांनी मुलांना भेटण्यासाठी आर. के. पुरम आश्रमाला आकस्मिक भेट दिली व मुलांसाठी सत्संगाचे संचलन केले.

सोमवार दि ३० रोजी सुमारे ७ वाजता गुरुदेव मुरादाबाद साठी निघाले व तेथे सुमारे ११ वाजता पोहोचले. काही उशीरामुळे मुले गुरुदेवांच्या नंतर तेथे पोहोचली. गुरुदेव मुलांची आतुरतेने वाट पाहत होते. जेव्हा मुले पोहोचली तेव्हा गुरुदेवांनी आपल्या खोलीतून बाहेर येऊन त्यांचे स्वागत केले व त्यानंतरच ते जेवणासाठी व विश्रांतीसाठी गेले.

दुपारी ३:०० वाजता गुरुदेव रुद्रपूर येथे जाण्यासाठी निघाले व सायंकाळी ६:४५ वा तेथे पोहोचले. सकाळी ९ वाजता सत्संग झाला व गुरुदेवांनी ज्या गोदामवजा जागेमध्ये जेवण वाढले जाते तेथेच मुलांबरोबरच जेवण घ्यायचे ठरविले. त्यांनी मुलांसमवेत वार्तालापामध्ये थोडा वेळ व्यतीत केला. एका बंधुने विचारले, 'आध्यात्मिक व भौतिक कार्यामध्ये फरक कसा काय करायचा?' गुरुदेवांनी उत्तर दिले की, काम हे काम आहे. त्यामध्ये आध्यात्मिक व भौतिक असा फरक करता येत नाही. आपण न्हाणीघर स्वच्छ का करतो? ते केले पहिजे म्हणजे केलेच पाहिजे. त्यानंतर ते म्हणाले की आपण चौकोनाच्या चार कोपऱ्यापासून चार निरनिराळ्या दिशांना ओढले जात असतो. हे पाश म्हणजे, कुटूंब, समाज, धर्म आणि इच्छा. आपण या चौकोनाच्या मध्ये अडकलेलो असतो. आपण जसे जसे या पाशांपासून स्वत:ला मोकळे करीत जाऊ, तसे तसे आपण स्वतंत्र होत जाऊ. गुरुदेव त्यानंतर आपल्या खोलीमध्ये विश्रामाकरिता गेले.



दिल्ली



मोरादाबाद



रुद्रपूर

खंड ४ अंक ४
श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र
जुलै २०११


सतखोल

## सतखोल

दि. १ जून रोजी सकाळी ७ वा. पूज्य गुरुदेवांनी सत्संगांचे संचलन केले. त्यानंतर सुमारे १० वा. निघून ते दुपारी सतखोल येथे पोहोचले. यावेळी हवामान आल्हाददायक व वातावरण रम्य होते. संध्याकाळी पू. गुरुदेव बाहेर मोकळ्या जागेत येऊन बसले होते व अभ्यासींच्या विविध प्रश्नांना उत्तरे देत होते. यावेळी ते म्हणाले की हे जग उपभोग घेण्यासाठी नाही. आपल्याला पंचेंद्रिये ही येथे शिकण्यासाठी व जगाबद्दल माहिती मिळविण्यासाठी देण्यात आलेली आहेत. परंतु आपण त्यांचा उपयोग आपल्या सुखाकरिता करत असतो. ईश्वराने आपल्याला दिशा दाखविण्यासाठी बुद्धीमत्ता दिली आहे व योग्य दिशेने मार्गाक्रमण करण्यासाठी इच्छाशक्तीने भरलेले हृदय दिले आहे.

जवळ-जवळ दररोज ते विद्यार्थ्यांसोबत हास्यविनोद करीत बोलत बसत परंतु अभ्यासींना त्यांच्यापासून मिळणारी अध्यात्मिक प्रेरणा अधिक हृदयस्पर्शी होती.

ओमेगामधील मुलांना 'ओमेगातर्फे प्रेमपूर्वक' असे लिहीलेले एक छोटेसे स्मृतीचिन्ह देण्यात आले. यामध्ये एक लहानसे पुस्तक, सी.डी., व पूज्य गुरुदेवांच्या हस्ताक्षरातील एका संदेशाचा समावेश होता.

शेवटच्या दिवशी पूज्य गुरुदेव विद्यार्थ्यांना म्हणाले, "दुसरे तुम्हाला काय म्हणतांत यांवरुन कधीही स्वत:चे मूल्यमापन करु नका. इतरांना तुमचा आरसा म्हणून वापरु नका. मी जो आहे तो आहे आणि मला ते बनायचे आहे, जे मी बनले पाहिजे. आपण जे आहोत आणि आपण जे बनले पाहिजे यामधील प्रवास म्हणजेच सहजमार्ग होय."

दि. ४ रोजी दुपारी पूज्य गुरुदेवांनी रुद्रपूरसाठी प्रस्थान ठेवले. मार्गावरील हलद्वानी आश्रमात ते काही काळ थांबले होते. दि. ५ रोजी पूज्य गुरुदेवांनी सकाळच्या सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर ते मोरादाबादकडे रवाना झाले. तेथे रात्रभर राहिल्यानंतर दि. ६ रोजी सकाळच्या सत्संग व नाश्त्यानंतर त्यांनी दिल्लीकडे प्रस्थान ठेवले जेथे ते १२.३० वा. पोहोचले. हा त्यांच्या या प्रवासाचा शेवट होता.

## सिंगापूर

दि. १६ जून रोजी रात्री पूज्य गुरुदेवांचे सिंगापूर येथे आगमन झाले. बंधू नितीन गोविला यांच्या घरी गुरुदेवांचा मुक्काम होता. मर्यादित जागेमुळे सकाळचा सत्संग परदेशी अभ्यासींसाठी व संध्याकाळचा सत्संग स्थानिक अभ्यासींसाठी अशी विभागणी करण्यात आली होती. दोन सत्संगांदरम्यान अभ्यासी एकत्र वेळ घालवित व पूज्य गुरुदेवांची वाट पहात असत. जवळपास सगळ्या सत्संगांचे संचालन पूज्य गुरुदेवांनी केले. दि. १९ रोजी पूज्य गुरुदेवांचे स्वागत करण्यासाठी सगळे अभ्यासी सिंगापूर मेडिटेशन सेंटरमध्ये जमा झाले होते. सत्संगानंतर पूज्य गुरुदेवांनी सगळ्या उपस्थितांना प्रेमपूर्वक अभिवादन केले. रांगेत उभ्या असणाऱ्या अभ्यासींजवळून जाताना ते काहींशी दोन शब्द बोलत होते तर कुणाकडे बघून नुसतेच स्मित करित होते, कुणाच्या पाठीवर हळूच थोपटून पुढे जात होते तर मुलांना विशेष आशीर्वाद मिळत होते. हे जणू एका ज्योतीसारखेच होते जी प्रत्येकाच्या हृदयास स्पर्श करुन जणू प्रकाशित करित होती. नंतर पूज्य गुरुदेव आधुनिक सिंगापूरमधील उत्कृष्ट बांधकामाचा नमुना असलेले मरिना बे सॅन्ड्स बघण्यासाठी गेले.

सोमवारी संध्याकाळी पूज्य गुरुदेवांनी प्रशिक्षकांसाठी सत्संगाचे संचालन केले व ते उपस्थित अभ्यासींशी सुमारे ३० मिनीटे बोलले. त्यांच्या संभाषणातील काही उतारे खाली दिले आहेत.

- एकदा कुणीतरी बाबूजी महाराजांना विचारले की आपण संपन्नतेच्या विरोधात आहात का ? तेव्हा बाबूजी महाराज म्हणाले मी त्याच्या विरोधात नाही. पैसा कमविणे हे तुमच्या कौशल्यावर अवलंबून आहे, परंतु पैसा हा नदीप्रमाणे सतत वाहता असला पाहिजे. तुम्हाला जेवढी गरज आहे तेवढे घेतल्यावर उरलेले सगळे काही पुढे प्रवाहित झाले पाहिजे.
- तर सहजमार्गाचे सगळे सार हे संतुलनात आहे. जीवनात गुणवत्ता आणणे, जीवनात तत्त्वांचा समावेश करणे, वस्तू जमविण्यापेक्षा काही बनणे महत्वाचे आहे.
- शिस्त ही प्रेमातून निर्माण झाली पाहिजे. सहजमार्गाची विशेषता म्हणजे ध्यानाद्वारे आपल्या हृदयामध्ये गुरुदेवांविषयी प्रेम निर्माण होते, ते वाढत जाते व त्यामधूनच शिस्त निर्माण होते.
- प्रत्येक रोपटे आपल्या विशिष्ट गतीने वाढत असते. तुम्ही हे म्हणू शकत नाही की सर्वांनी एकत्रच वाढले पाहिजे. जेव्हा पूर येतो तेव्हा पाणी एकसारखे वाढते पण ते प्राणघातक असते. हे (प्रेम) आपोआपच वाढले पाहिजे आपंण त्यासाठी जबरदस्ती करु शकत नाही.

दि. २२ रोजी दुपारी पूज्य गुरुदेवांनी मलेशियाकरिता प्रस्थान केले जेथे त्यांना मलेशियन आश्रम व मलेशियन चर्चासत्राचे उद्घाटन करावयाचे होते.


ओमेगा स्कूलचे विद्यार्थी गुरुदेवांबरोबर सतखोल येथे


© Shri Ram Chandra Mission
सिंगापूर

# २४ जुलैच्या उत्सवाची पूर्वतयारी

## सहज मार्गातील भंडाऱ्याचे महत्त्व

सहज मार्गाच्या सुरुवातीच्या दिवसात पूज्य बाबूजींच्या शहाजहानपूर येथील लहानशा घरात सुमारे तीस अभ्यासी भंडाऱ्याच्या निमित्ताने एकत्र जमत असत, याची आठवण गुरुदेव आपल्याला अनेकदा करून देतात. या वर्षी डायमंड ज्युबिली पार्क येथे होणाऱ्या भंडाऱ्यामध्ये सुमारे ५०००० अभ्यासी सहभागी होणार आहेत. आपल्या सर्व गुरुदेवांनी केलेल्या अतिभव्य कार्याचे आता दृष्टीसमोर प्रकटीकरण होण्यास सुरुवात झाली आहे.

२४ जुलै २००६ रोजी रायपूर येथे केलेल्या भाषणात पूज्य गुरुदेवांनी 'भंडाऱ्यांचे आध्यात्मिक महत्त्व' याबद्दल माहिती दिली व खालील मुद्दे मांडले–

- भंडाऱ्यांमध्ये जरी उत्सवाचा अंश असला तरी ते काही सण नव्हेत. ते मौज–मजेकरिता नाहीत. या वेळी, आश्चर्यकारक रित्या आध्यात्मिक कृपाप्रसादाने भरलेल्या या प्रसंगी, जी आंतरिक स्थिति तयार होते त्याचा आनंद घेण्याची अनुमती आहे. प्रत्येक उपस्थित अभ्यासीने जो काही वेळ आपण भंडाऱ्यामध्ये एकत्र असू तो सर्व वेळ सतत स्मरण करावे व अशा प्रसंगांचा स्वत:च्या आध्यात्मिक उन्नतिकरिता उपयोग करावा.
- या उद्दिष्टापासून फारकत याचा अर्थ आपण आपली साधन–सामुग्री व वेळ नकोशा गोष्टींच्या मागे लागण्यात उध्दटपणे वाया घालवत आहोत. मलाही सामोसा आवडतो, पण याचा अर्थ असा नाही की भाषणे चालू असताना, सामोसा संपण्याच्या काळजीने आपण उपहारगृहात गर्दी करावी.
- ध्यानाच्या वेळी, तसेच भाषणे ऐकताना, आपल्या बंधु–भगिनींनी प्रस्तुत केलेल्या संगीताचा लक्षपूर्वक आस्वाद घेताना, आपल्या आत्म्याने नृत्य केले पाहिजे, शरीराने नाही.
- प्रेम व भक्तीची भावना मनात उत्पन्न करणे हा भजनाचा उद्देश आहे. आपण लक्षपूर्वक भजनाचे श्रवण करत असताना गुरुदेवांच्या कृपेचा आपणावर वर्षाव होत असतो.
- एका संदेशात पूज्य बाबूजी महाराज म्हणतात की जेथे आनंद नाही तेथे आध्यात्मिकता नाही. परंतु आनंद प्रकट होऊ नये, तो हृदयात असावा. आंतरिक आनंद, आत्म्याला आनंदाच्या उकळ्या फुटणे काही काळाकरिता आपल्याला एका अनोळखी, कधीही न पाहिलेल्या जगात घेऊन जातात, ज्याला आपण 'ब्राईटर वर्ल्ड' असे म्हणतो.
- मी आपणा सर्वाना विनंती करतो की भंडाऱ्यासारख्या प्रसंगांचा उपयोग केवळ हुशारीने व लक्षपूर्वक न करता आपला आत्मा, आपले शरीर व आपले मन या सर्वांना एकत्र आणून आपल्या श्रेष्ठ गुरुदेवांवर लक्ष केंद्रित करण्यारिता केला पाहिजे. गुरुदेव आपल्याला या अस्तित्वाकडून अवर्णनीय अशा दुसऱ्या अस्तिवाकडे घेऊन जात आहेत याची जाणीव आपल्याला ध्यानाच्या प्रत्येक सत्रामध्ये होत असते.

http://www.sahajmarg.org/literature/online/speeches/the-real-purpose-of-bhandaras




गुरुदेवांच्या जन्मदिवसाच्या उत्सवाची पूर्वतयारी डायमंड ज्युबिली पार्क, तिरुप्पुर येथे मोठ्या प्रमाणावर चालू आहे. ध्यान–कक्ष, निवासाकरिता तंबू, उपहार–गृहाची जागा व इतर सोयी–सुविधा उभारण्यात येत आहेत. पाण्याची कमतरता असल्याने अशा कार्यकमाचे नियोजन आव्हानात्मक आहे. पाण्याचे नळ व प्रसाधनगृहे यांची तपासणी चालू आहे.उत्सवाकरिता वीज व विजेची पर्यायी व्यवस्था करण्यात येत आहे. स्वयंसेवकांना कामात आनंद वाटत आहे व भंडाऱ्याकरिता गुरुदेव व अभ्यासींचे आगमन होण्यापूर्वी या संपूर्ण जागेचा कायापालट कसा घडून येईल याचा ते विचार करित आहेत. आपल्यापैकी प्रत्येकाने भंडाऱ्यात सहभागी होण्याकरिता तयारी केली पाहिजे व 'प्रेमातील शिस्त' या भंडाऱ्याच्या विषयावर चिंतन केले पाहिजे

## बाबूजी महाराज

"गुरुदेवांचा जन्मदिवस आपल्या मिशनकरिता विशेष दिवस असून तो अत्यंत आदरपर्वक साजरा करावा. प्रत्येक अभ्यासीने याची जाणीव ठेवावी की सर्वोच्च्य अशा नियतीकडे घेऊन जाणारा दैवी वाटाड्या आपल्याला या जन्मात लाभला आहे. साधनेच्या कृतीतला हा विशेष समय असून शिष्याच्या हृदयाला आभार व्यक्त करण्याकरिता दिलेली ही एक संधी आहे."

शुक्रवार, ३० एप्रिल २००४– सकाळी १० वाजता
व्हिस्पर्स फ्रॉम दि ब्राईटर वर्ल्ड





खंड ४ अंक ४
श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र
जुलै २०११



# पूज्य बाबुजी महाराजांच्या ११२व्या जन्मदिवसाचा समारंभ

आपल्या पूज्य बाबूजी महाराजांचा ११२वा जन्मदिवस संपूर्ण देशात कृतज्ञतापूर्वक व भक्तीभावाने साजरा केला गेला. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे–


गुलबर्गा


हुबळी


दुर्गापूर

## उत्तर कर्नाटक

गुलबर्गा आश्रमाकडे गुलबर्गा, सेडम, चित्तपूर, शोरपूर व हुम्नाबाद येथील सुमारे ३०० अभ्यासींचे यजमानपद होते. बाबूजींच्या जीवनावरील चित्रफीत, 'त्यांच्यासोबत' ही ध्वनीफीत, बाबूजी महाराजांसोबतच्या अनुभवांवर भाषणे, बाबूजींच्या जीवनासंबंधी प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम आणि 'गुरुदेवांचे बोल' ही चित्रफीत हे सर्व या समारोहाचा भाग होते. अभ्यासींनी या दिवसाच्या दैवी कृपाप्रसादाचे सुख उपभोगले.

धारवाड, बेलूर, गदग, पुडकलकी, सिरसी, कुकनूर, राणीबेन्नूर आणि कल्लूर येथील सुमारे २५० अभ्यासी सकाळच्या चित्तवेधक सत्संगासाठी हुबळी येथील आश्रमात जमले होते. न्याहारीनंतर 'कालातीत प्रवास' ही चित्रफीत प्रसारीत करण्यात आली. बाबूजींच्या जीवन, तसेच बाबूजी व गुरुदेवांच्या जीवनातील प्रसंगांचे रेखाटन करणारे नाटक युवकांनी सादर केले. तसेच 'मूलतत्वाचा चेहरा' ह्या स्लाइड शो मध्ये बाबूजींची छायाचित्रे प्रदर्शित करण्यात आली. दुपारच्या सत्रात चाचणी व मुलांचे कार्यक्रम झाले व संध्याकाळच्या सत्संगाने समारोप झाला. आश्रमातील वातावरण भंडाऱ्यासारखेच वाटत होते.

बिदर आश्रमातील समारोहात भालकी,चंगलेर व ठाणा कुशनूर येथील सुमारे १२७ अभ्यासी सहभागी झाले होते. बाबूजी महाराजांचे जीवन व शिकवण हे विषय या कार्यक्रमात केंद्रस्थानी होते. बंधू हरीलाल यांनी भाषण केले आणि बंधू पंढरीनाथ यांनी बाबूजींची शिकवण व अवतरणे यावरच्या चाचणीचे संचलन केले.

## दक्षिण कर्नाटक

बंगलोर येथील बनशंकरी आश्रमात बंधू (डॉ.) पेरुमल, भगिनी वसंताकुमारी, बंधू सुब्रमण्यम बी.जी. आणि भगिनी माधुरी या चार वक्त्यांनी बाबूजींबद्दल आदर व्यक्त करणारी अत्यंत मनोरंजक भाषणे केली. यासाठी बाबूजींचे जीवन व शिकवण अधोरेखीत करणारे विषय निवडण्यात आले होते. एका वक्त्याने भौतिक जगातील कार्यपध्दती अवगत असलेले शिक्षक व शिष्यांच्या जीवनातील प्रत्येक क्षणाकडे आईप्रमाणे लक्ष देणारे आध्यात्मिक गुरू यांच्यामधील फार मोठा फरक निदर्शनास आणला. बंधू श्रीनिवास आणि बंधू सुब्रमण्यम यांनी घेतलेली चाचणी ही अभ्यासींचे फक्त कुतूहलच जागृत करणारी नव्हती तर फार मोठी शिकवण देणारी होती. दुपारच्या सत्रात बाबूजींच्या जीवनावरील चित्रफीत दाखवण्यात आली व संध्याकाळच्या सत्संगाने या कार्यक्रमाचा समारोप झाला.


कोलेगल


लखनौ

कोलेगल येथील समारंभास कोलेगल तसेच टी. नरसीपुरा येथील सुमारे ४१ अभ्यासी हजर होते. बंधू मधूसुदन, बंधू महादेवगौडा, भगिनी अलूमेल्लमा, भगिनी धनलक्ष्मी, बंधू शिवकुमार व बंधू महादेवस्वामी यांनी या प्रसंगी भाषणे केली. सहभागींनी या उत्सवातून दिव्यत्वाशी एकरूप झाल्याचा अनुभव घेतला.

## पश्चिम बंगाल

दि. २९ एप्रिल रोजी संध्याकाळच्या सत्संगाने कार्यक्रमाची सुरवात झाली. दुसऱ्या दिवशी कलकत्ता, बुरद्वान, पानागड, राणीगंज,आसनसोल,बुरनपूर, कजोरा, सियुरी,अंदल,चित्तरंजन आणि बनकुरा केंद्रातील सुमारे ८० अभ्यासी व मुले दुर्गापूर येथे जमा झाले. बंधू यू.एस. मिश्रा,भगिनी कुसूम मेहेरा व बंधू परीमल यांनी सकाळच्या सत्रात भाषण केले व त्यानंतर चित्रफीत दाखवण्यात आली. दुपारच्या सत्रातील प्रश्नोत्तरांनी अनेक शंकांचे निरसन केले. त्यानंतर संध्याकाळचा सत्संग झाला. दि. १ मे रोजी सकाळच्या सत्संगाने सोहळ्याचा समारोप झाला. या मेळाव्यामध्ये अभ्यासींनी आध्यात्मिक वातावरणाचे सुख अनुभवले.

## उत्तर प्रदेश

लखनौ येथे ४२८ अभ्यासी संपूर्ण दिवसभराच्या कार्यक्रमास उपस्थित होते. दिवसभरात बाबूजींच्या जीवनावरील चित्रफीती दाखविण्यात आल्या, भाषणे करण्यात आली व अभ्यासींनी भजने गायली. तरूणांनी व मुलांनी आध्यात्मिक शिकवणीवर आधारीत कार्यक्रम सादर केले. संध्याकाळच्या ५.३०च्या सत्संगाने सोहळ्याचा समारोप झाला.


चिन्नावल्लीकुलम


जबलपूर

## जबलपूर , म.प्र.

दि. २९ एप्रिल रोजी संध्याकाळच्या सत्संगाने, सुमारे ३५० अभ्यासींच्या उपस्थितीत 'प्रेमातील शिस्त' या संकल्पनेवर आधारित विषयाने कार्यक्रमाची सुरवात झाली. जेव्हा आपण अध्यात्माच्या वाटेवर प्रवेश करतो तेव्हा आपण कसे गुरूदेवांशी नाते जोडतो, तसेच आपल्या अर्ध-जागृत मनात गुरुदेवांबद्दल प्रेम कसे विकसीत होते व ते कसे आपण जागृत अवस्थेत करत असलेल्या प्रत्येक गोष्टीला आधार देते हे विभाग प्रमुख बंधू विकल्प यांनी विषद केले. भगिनी दीपा भारद्वाज यांनी 'प्रेमिकांचे गुण' या विषयावर भाष्य केले व 'सुव्यवस्थित दिवानगी' हा शब्दप्रयोग तयार केला.

डॉ. आर.के. श्रीवास्तव यांनी 'खरा प्रेमी कसा आपोआप शिस्तबध्द होतो' यावर व भगिनी सुनीता शुक्ला यांनी 'प्रेम आणि शिस्त कसे एकमेकांचा हात धरून चालतात' यावर भाष्य केले. चाचणी, दहा सुत्रांवर आधारित नाटिका व भजने यामुळे सर्वांना दिव्यत्वाची प्रचिती आली. बाबूजींच्या जीवनावरील चित्रफीत दाखवण्यात आली व त्यानंतर मुलांच्या मनोरंजनाचा कार्यक्रम झाला. रविवारी बंधू विकल्प यांनी आश्रमाच्या मालमत्तेचे जतन करण्याची आवश्यकता अधोरखित केली, जेणेकरुन ती पुढील पिढ्यांकडे संक्रमित केली जाईल. अशा प्रकारे या कार्यक्रमाची सांगता झाली.

## दक्षिण तामिळनाडू

मदुराई येथील समारंभात नजिकच्या १३ केंद्रातील सुमारे ५०० अभ्यासी सहभागी झाले होते. कार्यक्रमाची संकल्पना 'बाबूजींचा सत्योदय' ही होती. मदुराई, शोलवंदन,थेनी, वत्तलकुंड व कारइकुडी केंद्रातील सहभागींनी या पुस्तकातील काही भाग विषद केले. जेवणानंतर मेलूर, सिंगमपुनारी, परमाकुडी, रामानाथपुरम, मनमदुराई व शिवगंगई केंद्रातील सहभागींनी उर्वरीत भाग सादर केले. बंधू पलनीअप्पम, बंधू नागराजन व बंधू राधाकृष्णन यांनी सूत्रसंचालन केले. आश्रमाच्या दिव्य वातावरणात, बाबूजींचे स्मरण करत राहिल्यामुळे व त्यांच्या लिखाणाचे चांगले आकलन झाल्यामुळे सर्व सहभागी आनंदी होते.

चिन्नवल्लीकुळम आश्रमात विरूदुनगर, चिन्नवल्लीकुळम, अरुप्पुकोटै, करयपट्टी, कोविलपट्टी व सिवकाशी या केंद्रातील सुमारे ५०० अभ्यासी सहभागी झाले होते. सकाळच्या सत्संगानंतर बंधू स्वामीनाथन यांनी बाबूजी महाराजांच्या जीवनचरित्राचे वाचन केले. सहभागींनी साधना, चारित्र्याची जडण घडण, स्वीकार व समर्पण या विषयांवर त्यांचे विचार व्यक्त केले. मिशनचे कार्य हे आपले स्वत:चे कार्य आहे असा विचार प्रगट होण्याची गरज असल्याचा महत्वाचा मुद्दा समोर आला. दुपारच्या सत्रात 'प्रेम' या विषयावर गट चर्चा झाली. संपूर्ण कार्यक्रमाचा शेवट संध्याकाळच्या सत्संगाने झाला.


अहमदाबाद


आणंद

## गुजरात

गुजरातमधील कार्यक्रमात आणंद येथे सुमारे ८३ अभ्यासी सहभागी झाले होते. सत्संगानंतर दाखवलेली 'प्रेमाचा सागर' ही चित्रफीत सर्वांना बाबूजी महाराजांच्या काळात घेऊन गेली. न्याहरीनंतर प्रत्येक अभ्यासीला महत्वाचे संदेश असलेली एक छोटी कथा देण्यात आली. सहभागींनी त्या कथेच्या सारांशावर विचार व्यक्त केले. दुपारच्या सत्रात ध्यान, सफाई, प्रार्थना, सतत स्मरण व जीवीत गुरूची आवश्यकता यावर गट चर्चा झाली. संध्याकाळच्या सत्संगानंतर भजनांचे गायन झाले.

अहमदाबाद येथील सोहोळ्यात गुजरातमधील ६-अ या विभागातील ९०० अभ्यासी सहभागी झाले होते. या कार्यक्रमात गट चर्चा व नाटिकेचे सादरीकरण झाले. गुरूदेवांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. पर्यावरणाची काळजी व त्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आश्रमात वृक्षारोपण करण्यात आले. नवीन अभ्यासींसाठी रविवारी 'अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम' झाला. त्यानंतर जे वक्ते दूरवरच्या केंद्रांमध्ये तसेच नजिकच्या छोट्या केंद्रांमध्ये कार्यक्रम करणार आहेत त्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

# Youth Programmes

## युवा उन्नती शिबीर इंदोर, म.प्र.



इंदूर येथे दि. ४ व ५ जून रोजी १७ वर्षांवरील युवकांसाठी दोन दिवसीय निवासी शिबीर आयोजीत करण्यात आले होते. युवकांना विविध कौशल्ये आत्मसात करण्यास तसेच त्यांना आध्यात्मिक आणि भौतिक विकासाचा समतोल साधण्यास मदत करणे हा या शिबीराचा हेतू होता.

यातील सहभागी युवक सानवेर, भोपाळ, सोहागपूर, देवास, रतलाम, विदिशा, आणि इंदूर येथून आले होते. त्यांचे चार गट करण्यात आले होते. यात 'संभाषणकला' याविषयावर एक सत्र घेण्यात आले. त्यानंतरचे सत्र धैर्य, प्रश्न सोडवण्याची चिकाटी विकसीत करणे आणि सरधोपट मार्ग न अवलंबता वेगळा विचार करण्यास प्रोत्साहित करणे व कल्पकतेचा विकास करण्याचे होते. संध्याकाळी 'द सिक्रेट' हा चित्रपट दाखवण्यात आला.

दुसऱ्या दिवशी रविवारच्या सत्संगा नंतर सांघिक कार्य व वेळेचे नियोजन करण्याच्या क्षमतेचा विकास करणारे एक सत्र होते. त्यात खेळांचा सुध्दा समावेश होता. मुलाखत कौशल्यावर एक संवादी सत्र व गट चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. निरोपाच्या सत्राचे सूत्र संचालन बंधू विकल्प मुंद्रा आणि बंधू श्रेयसकर चौधरी यांनी केले. ज्यांच्या उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर कर्मचारी काम करतात अशा दोन तरुण उद्योगपतींनी प्रत्यक्ष जीवनात घडणाऱ्या प्रसंगांवर विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली व त्यांचे अनुभव सांगितले. हा कार्यक्रम सर्वांसाठी खरोखरच खूप व्यवहार्य, आनुभाविक, माहितीपूर्ण व उपयोगी होता.

## विभागीय युवा शिबीर , वडोदरा, गुजरात.

दि ११ व १२ जून रोजी पहिल्यांदा या केंद्रामधे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विविध केंद्रातील ७५ युवक या मधे सहभागी झाले होते. सकाळच्या सत्रामधे चारित्र्य घडण आणि साधनेच्या विविध पैलूंवर गट चर्चा, सहभागींचे सादरीकरण आणि प्रश्नोत्तरे झाली. दुपारच्या सत्रात दहा सूत्रांवर आधारीत नाटिकेची तयारी व सादरीकरण झाले. संध्याकाळी मैदानी खेळ घेण्यात आले. सहभागींनी रात्रीच्या जेवणानंतर गाणी व भजने गायली. हास्यविनोद केले. आपली साधना परिणामकारक कशी करायची यावरचे बंधू कमलेश पटेल यांचे सत्र व नंतरचे संवादी सत्र सर्वांसाठी फारच लाभदायी ठरले. सर्वांना पुढील युवा कार्यक्रमाचा विषय सुचवण्यास सांगितले. 'इच्छा शक्ती व अनुशासन' हा विषय ऑक्टोबर मधे भरवण्यात येणाऱ्या पुढील शिबीरासाठी निवडण्यात आला.

## युवकांसाठीचे रविवारचे कार्यक्रम, डोमलगुडा, आंध्र प्रदेश

डोमलगुडा आणि एस आर नगर आश्रम मध्ये जानेवारी २०११ पासून दर रविवारी सकाळी ९.३० ते ११.३० या वेळात युवकांसाठी कार्यक्रम सादर केले जातात. सुमारे २०-२५ जण या कार्यक्रमात भाग घेतात. युवकांना संवाद साधण्याचे आणि साधना व मिशन या बद्दल अधिक जाणून घेण्याचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे ही हा कार्यक्रम सादर करण्यामागची कल्पना आहे. या कार्यक्रमात चारित्र्याची जडण-घडण, रोजनिशी लिखाण, मजेदार खेळ, सहज मार्ग साहित्यावर शब्दकोडी, कथाकथन, भूमिका सादरीकरण, मूकाभिनय, प्रशिक्षकांबरोबर प्रश्नोत्तरे अशा विविध विषयांवरील कार्यक्रम सादर केले जातात. युवकांमधे चारित्र्य घडविण्यासाठी आणि सहज मार्गाची मूल्ये ठसविण्यासाठीच हे कार्यक्रम सादर केले जातात.

## निवासी शिबीर, इंदोर

दि. २१मे व २२ मे रोजी इंदोर येथे किशोरवयीन मुलांसाठी एक शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्याचा हेतू या भावी अभ्यासींमधे एकतानता निर्माण करणे हा होता. या किशोरवयीन मुलांनी स्वत:ची ओळख स्मरणशक्तीच्या खेळातून मोठ्या कल्पकतेने करून दिली. त्यानंतर त्यांना ५ गटांमधे विभागले आणि ते गाठ बांधणे,कागदावर उभे राहून त्याची घडी घालणे तसेच पारंपारिक मटका फोडणे स्पर्धा अशा विविध कार्यक्रमात सहभागी झाले. 'स्वत:ची ओळख' व 'ध्येय निश्चीती' या सारखी सत्रे भगिनी यामिनी करमरकर व बंधू सुनिल खन्ना यांनी संचलित केली. संध्याकाळी मुलांना जवळच्या रिजनल पार्क मधे नेण्यात आले. भगिनींच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी चविष्ट पावभाजी देखील बनवली.

दुसऱ्या दिवशी शिबिरार्थी एस.आर.सी.एम.च्या नवीन जागेवर गेले. तेथे पारंपारिक भारतीय खेळांचे साहित्य तयार ठेवले होते. पुढील दोन तास त्यांनी पतंग उडवणे,विटी दांडू व सटोलीया खेळण्यात व्यतीत केले. 'माझ्या हृदयीचे पत्र' हे भगिनी शशी शर्मा आणि बंधू राजेश रावेरकर यांचे सत्र फ़ारच हृदयस्पर्शी होते. त्यांनी एका आईने तिच्या मुलाला लिहिलेले एक पत्र वाचून दाखवले. त्यात तिने आपल्या मुलाच्या कल्याणाबाबत,हिताबाबत वाटणारी कळकळ व्यक्त केली होती. त्याचे उत्तर म्हणून प्रत्येक मुलाने आपल्या आईला तिच्या विषयी वाटणारे प्रेम व कृतज्ञता व्यक्त करणारे पत्र लिहीले. त्याचा हेतू मुलांना त्यांच्या आयुष्यात असणारे आईवडीलांचे महत्व पटवून देणे हा होता. सत्राचा समारोप 'सर्वशक्तीमान परमेश्वर आणि मी' या कार्यक्रमाने झाला.



वडोदरा



नवासी शिबीर, इंदोर

# मुलांसाठी उन्हाळी शिबिरे

## बाबूजी मेमोरियल आश्रम, चेन्नई

७ ते १३ वर्षे वयोगटातील सत्तर मुलांसाठी दि. ६ ते ८ मे दरम्यान एका शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मुलांच्या मनांतील कुतुहल मिश्रित औत्सुक्याचा अनौपचरिकपणे भंग करीत शिबिराची सुरुवात झाली. त्यानंतर हस्तकलेचा कार्यक्रम झाला. शारीरिक व्यायाम, गुरुदेवांवरील गीते, परस्परांशी बातचीत, आश्रमाचा नकाशा काढणे, संघभावना वाढीस लागण्याच्या उद्देशाने विविध खेळ, प्रेमाने सगळ्यांना जिंकता येते या विषयावर छोटीशी हास्यकविता, कापडी पिशव्या रंगविणे, जीवनाचा वास्तविक ठेवा काय आहे हे शोधण्यासाठी खजीना शोधाशोध उपक्रम व सामान्य ज्ञान चाचणी आदी सत्रांचा या तीन दिवसीय उपक्रमात समावेश होता. भगवान श्री कृष्णावरील एक चित्रपटही दाखविण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमाने सत्राची अखेर झाली. त्यानंतर सर्व मुलांना एका नव्या मित्राच्या रुपाने एकेक गुलाबाचे रोपटे व कार्यक्रमाची सीडी भेट देण्यात आली. मुले व त्यांच्या पालकांच्या परस्पर प्रतिक्रिया कथनाने उपक्रमाची सांगता झाली.


Chennai

## वेल्लोर, तामिळनाडू

३ ते १५ वर्षे वयोगटातील ५० मुलांसाठी दि. २८ मे रोजी एक दिवसीय शिबिराचे आयोजन वेल्लोर आश्रमात करण्यात आले होते. विविध ठिकाणच्या मुलांमध्ये परस्पर संवाद घडावा तसेच नैतिक मूल्यांसह एक अनुशासित जीवन पध्दति विकसित व्हावी हा ह्या कार्यक्रमाचा उद्देश होता. मुलांची दोन वयोगटात विभागणी करण्यात आली. गट, सांघिक व वैयक्तिक अशा स्तरांवर सर्जनशील उपक्रमांचा समावेश होता. वैयक्तिक प्रदर्शनात गायन, शास्त्रीय नृत्य, योगा आदि विषयावर मुलांनी आपली कला प्रस्तुत केली. युवा मुलांनी "सहजमार्ग – एक जीवन पध्दति" ह्या विषयावर एक नाटिका सादर केली.या नाटिकेत एका तरुणाच्या जीवनातील आंतरिक बदल तसेच त्याच्या मित्र परिवार व कुटुंबातील वातावरणामध्ये परिवर्तन घडविण्यासाठी गुरुदेवांप्रति त्याने केलेली आर्त याचना चित्रित करण्यात आली होती.


वेल्लोर

## हैद्राबाद

दि. ६ ते ८ मे दरम्यान तीन दिवसीय सहज शिबिर संपन्न झाले. सुमारे नव्वद मुलांनी उत्साहाने त्यात भाग घेतला. एकमेकांबरोबर ओळख करुन घेणे व नविन मैत्री करुन घेण्याच्या उपक्रमाने शिबिराचा अनौपचारिक आरंभ झाला. आईवडिलांवर प्रेम, प्रेमातील अनुशासन, इ. विषयांवरील विविध कार्यक्रमांसाठी मुलांचे वेगवेगळे संघ करण्यात आले होते. एक तासाच्या मैदानी खेळानंतर मुलांना एका चित्राचा एक भाग दाखविण्यात आला व त्यावरुन त्यांना संपूर्ण चित्र कशाचे आहे ते ओळखायचे होते. मुले आपल्या आई वडिलांना किती ओळखतात ह्याचे त्यांना आकलन व्हावे यासाठी "आई वडिल व मित्र" या कार्यक्रमाने दुसऱ्या दिवसाची सुरुवात झाली. शंका निरसन व अभ्यासी होण्याच्या दिशेने पूर्वतयारी म्हणून बंधु अनंत यांच्या बरोबर मोठ्या गटाचा परस्पर चर्चेचा कार्यक्रम झाला. ध्यानामुळे दयाभाव कसा उत्पन्न होतो या विषयी बंधु श्रीनिवास यांनी विश्लेषण केले. 'माझे गुरुदेव' हे पुस्तक प्रत्येक मुलास वाचण्यासाठी दिले व त्यानंतर भगिनी रुचिता यांचे नृत्य सादरीकरण होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.


हैद्राबाद

## रायचूर

दि. १४ ते १६ एप्रिल दरम्यान पंचेचाळीस विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसांचे एक शिबिर भगिनी जी. लक्ष्मी व भगिनी नागवेणी यांनी भरविले होते. ईश्वर आणि गुरुदेव, निरामय जीवन व अनुशासन असे विषय विधार्थ्यांना सोप्या कथा व आख्यानातून समजावून सांगण्यात आले. दुपारच्या सत्रात याच विषयावरील कार्यक्रम सादर करण्यात आले. शेवटच्या दिवशी डॉ. बाळसुब्रमणियम आणि भगिनी अन्नपुर्णा यांनी अन्नसेवनाच्या कोणत्या आरोग्यदायक सवयी व शिष्टाचार निरोगी जीवन जगण्यास सहाय्य करतात या विषयी मार्गदर्शन केले. १७ तारखेस रविवारच्या सत्संगानंतर या विद्यार्थ्यांच्या पालकांना आमंत्रित करुन अशा उपक्रमांमागचे प्रयोजन विषद करण्यात आले. तसेच त्यांना आपले गुरुदेव, संस्था व साधनापद्धति या विषयी माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेतील आपले अनुभव कथन केले. मिशनची पुस्तके विक्रीसाठी प्रदर्शित केली होती तसेच पालकांना माहिती पत्रिका वाटण्यात आल्या. त्यापैकी काही पालकांनी साधना सुरु करण्याविषयी खूप स्वारस्य प्रकट केले.


रायचूर

## भुज, गुजरात

भुज केंद्राच्या वतीने दि. २३ ते २८ मे पर्यंत ६ ते १२ वयोगटातील मुलांसाठी एक शिबिर आयोजीत करण्यात आले होते. ७२ मुले सहभागी झाली होती व त्यांना वयानुसार दोन गटांमध्ये विभाजीत करण्यात आल होते. विविध विषयांवर मूल्याधिष्ठीत कार्यक्रम व त्यांच्या कौशल्यांच्या प्रदर्शनाचा उपक्रमात समावेश होता. शेवटच्या दिवशी शिबिराचा सारांश देण्यासाठी सर्व पालकांना आमंत्रित केले होते. तसेच त्यांना मिशन व साधना पध्दतीचा अनौपचारीक परिचय करुन देण्यात आला. चाळीसहून अधिक पालकांनी उपस्थित राहून आपल्या मुलांना प्रोत्साहन दिले. स्थानिक दूरदर्शन वार्तावाहिनी वरुन उन्हाळी शिबिराचा अहवाल प्रदर्शित करण्यात आला. गुरुदेवांच्या कृपेमुळे व जवळ जवळ चोवीस स्वयंसेवक व मुलांच्या मनापासून केलेल्या परिश्रमांमुळे हे शिबिर यशस्वीरित्या पार पडले.



भुज

## बहारैच केंद्र, उत्तर प्रदेश

लखनौ पासून ईशान्येला १२५ कि.मी. अंतरावर, नेपाळ सीमेच्या जवळ असणारे बहारैच हे एस.आर.सी.एम.चे एक उदयोन्मुख केंद्र आहे. उत्तर प्रदेशातल इतर जिल्ह्यांशी चांगल्या रस्त्यांनी जोडले गेले असल्याने हे या परिसरातील एक प्रमुख केंद्र बनले आहे. आश्रमाची जागा बहारैच पासून ६ कि.मी. अंतरावर असून आश्रमाचा परिसर २ एकरांचा आहे. दि. १२ जून रोजी आश्रमाकरिता भूमीपूजनाचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभाकरिता बंधु नरसिंग, बंधु विजय शंकर व गोरखपूर केंद्राच्या प्रशिक्षकांसहित सुमारे शंभर अभ्यासी उपस्थित होते. 'आश्रम हे आत्म्याचे निवासस्थान असून तेथे त्याच्या अस्तित्वाची ओळख पटते. भौतिक गोष्टींच्या प्राप्तीकरिता लोक मंदिरात जातात. परंतु आश्रम हे असे ठिकाण आहे, जेथे स्वत:ला जाणून घेण्याकरिता भौतिक गोष्टींचा त्याग केला जातो' असे उद्गार गोवडा केंद्राचे प्रशिक्षक बंधू बद्रिप्रसाद सिंग यांनी यावेळी भाषण करताना काढले.

## आठवड्याअखेरीचा कार्यक्रम, नत्रमपल्ली, तामिळनाडू



वेल्लोर केंद्रस्थानातील सुमारे ५५ अभ्यासींकरिता 'सहज मार्ग– जीवन मार्ग' नावाचा एक कार्यक्रम दि. २१ व २२ मे रोजी नत्रमपल्ली आश्रम येथे आयोजित करण्यात आला होता. बंधू भरतराजन यांच्या उद्घाटनाच्या भाषणानंतर 'साधनेचे महत्त्व' या विषयावर एक सादरीकरण करण्यात आले. साधनेच्या निरनिराळ्या पैलूंबद्दल उपस्थित अभ्यासींनी आपले विचार व मते व्यक्त केली. पूज्य गुरुदेवांनी चित्रफीतीद्वारा केलेले शंका–निरसन हा या कार्यक्रमाचा महत्त्वाचा भाग होता. समूह – चर्चा व चित्रफीतीचे प्रदर्शन यामुळे साधनेच्या विविध पैलूंचे महत्त्व अधोरेखित झाले. बंधू बालसुब्रमणियम यांनी बंधुत्वाबद्दल दिलेले भाषण व विचार–विनिमय सत्र यामध्ये सहज मार्गाला जीवनाच्या प्रत्येक भागात समाविष्ट करण्याच्या आवश्यकतेवर भर देण्यात आला.

## गोष्टींमधून शिक्षण, के.जी. एफ., दक्षिण कर्नाटक

बंगलोर येथील प्रकाशन समन्वयक व त्यांच्या संघाने के.जी. एफ., कोलार व मुलबागल येथील सुमारे तीस अभ्यासींकरिता एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. 'मिशनच्या साहित्याचे वाचन हे साधनेचे महत्त्वाचे अंग असून गुरुदेवांची पुस्तके ध्येयपूर्वक, लक्षपूर्वक, दररोज, पुन्हा–पुन्हा वाचल्याने आपल्या माहितीत भर पडते तसेच सतत स्मरणाकरिताही फायदा होतो'. असा संदेश यावेळी केलेल्या सादरीकरणाने उपस्थितांना दिला. इंग्रजी, तमिळ, कन्नड व तेलगू भाषेतील गोष्टी यावेळी उपस्थित अभ्यासींनी वाचून दाखवल्या. गुरुदेवांनी संगितलेल्या कथांवर व त्यांच्या निष्कर्षांवर यावेळी चर्चा झाली.

समन्वयकांनी हा कार्यक्रम मनोरंजक व अभ्यासपूर्ण पद्धतीने सादर केला. यानंतर मिशनची पुस्तके खरेदी करुन अभ्यासींनी आपला उत्साह प्रदर्शित केला.



## जागतिक पर्यावण दिवस, जामनगर

स्वयंसेवक व मुले यांच्या उत्साहपूर्ण सहभागासहित दि.५ जून रोजी जागतिक पर्यावण दिवस जामनगर आश्रम येथे साजरा करण्यात आला. बंधू सचिन व्यास यांच्या स्वागतपर भाषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली, त्यानंतर पक्षाचे घरटे बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. पक्ष्यांचे अभ्यासक बंधू अर्पित देवमूर्ती यांनी पक्ष्याचे घरटे कसे वापरावे, पक्ष्यांना खाऊ कसे घालावे, वृक्षरोपण कसे करावे याबद्दल उपस्थितांना महिती दिली. शहरी भागात पक्ष्यांना आकर्षित कसे करावे व पर्यावरणाची काळजी कशी घ्यावी याबद्दल मुलांना मार्गदर्शन करण्यात आले. चिमणीचे लाकडी घरटे, पक्षी–खाद्य व वेली या वेळी मुलांना भेट म्हणून देण्यात आल्या.

## हार्ट टू हार्ट, रायपूर, छत्तिसगढ

२४ एप्रिल रोजी रविवारच्या सत्संगानंतर योगाश्रम, रायपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'हार्ट टू हार्ट' या कार्यक्रमात ३७ भगिनी सहभागी झाल्या होत्या. त्यांचे ८ गट बनविण्यात आले व प्रत्येक गटाला एक विषय देण्यात आला. प्रत्येक गटाने दिलेल्या विषयावर परिश्रमपूर्वक विचार–मंथन केले व त्यांच्या नेत्याने निरिक्षणांचा गोषवारा सादर केला. 'सिस्टर' या इंग्रजी शब्दातील अक्षरांच्या आकर्षक व्याख्या करण्यात आल्या. भौतिक व आध्यात्मिक जीवनाचा समतोल राखण्याकरिता दहा सूत्रांचे पालन करण्याचा आम्ही प्रयत्न करू असे उपस्थित भगिनी या वेळी म्हणाल्या. अनेक लोकांना सहज मार्गाचा फायदा मिळावा याकरिता या भगिनी प्रयत्न करित आहेत. सकारात्मक दृष्टीकोनामुळे जीवनाचे प्रश्न सोडविण्यास मदत झाली तसेच सहज मार्गातील प्रवेशानंतर मुलांच्या वागण्यात फरक पडला असेही त्यांनी सांगितले. अभ्यासाकडे लक्ष, गुरुदेवांप्रति प्रेम व आश्रमाच्या कार्यक्रमात मुलांचा सहभाग वाढला आहे. आपले पालक सहज मार्गाशी संलग्न आहेत याचा त्यांना अभिमान वाटतो व साधनेची सुरुवात करण्यासाठी वयाची अठरा वर्षे पूर्ण करण्याची ते आतुरतेने वाट पहात आहेत. काही भगिनींनी आपल्या भावना कवितेच्या माध्यमातून व्यक्त केल्या. काहींनी गुरुदेवांशी असलेल्या त्यांच्या संलग्नतेबद्दल उदाहरणे दिली. असाध्य आजारावर केवळ गुरुदेवांप्रति असलेल्या विश्वासाने आपण कशी मात केली याचा अनुभव एका भगिनीने कथन केला. ओलावलेल्या नेत्रांनी व हेलावलेल्या हृदयांनी भगिनींनी गुरुदेवांची आठवण केली व प्रशिक्षक भगिनी रजनी दत्ता यांनी विचारांकरिता व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. नविनतम अशा प्रेम व भक्तिभावाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

केवळ खाजगी वितरणाकरिता

खंड ४ अंक ४
श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र
जुलै २०११

# प्रकाशाचे केंद्र

## मदुराई आश्रम








१९७५ साली एस.आर.सी.एम. ची छोटीशी सुरुवात बंधू थस्मास्वामींच्या मदुराईतील थेप्पाकुलम मधील निवासस्थानी झाली. बाबुजी महाराजांच्या पवित्र उपस्थितीत त्यांचा ७८ वा वाढदिवस साजरा करण्याची संधी मदुराई केंद्रास मिळाली. त्या निमित्ताने तमिळ व इंग्रजी मधील एका स्मरणिकेचे प्रकाशनही करण्यात आले.

दि. ११ व १२ एप्रिल १९९२ रोजी मदुराई केंद्राने आपली रजत जयंती साजरी केली. त्या प्रसंगी गुरुदेव म्हणाले, "अध्यात्मिकतेत ज्यांनी पदार्पण केले आहे त्यांच्या साठी ध्यान हे केवळ एक तासाचे कर्तव्य असू शकत नाही. ध्यान हे आपले ध्येय साध्य करण्यासाठी संपूर्णपणे वाहून घेतलेले एकमेव कर्तव्य आहे. ध्यान हे आपल्या सांस्कृतिक वारशातील शाश्वत लक्षण असले पहिजे." ह्या समारंभानंतर हे केंद्र मरियम्मन थेप्पकुलम पश्चिम तीर येथील डॉ गोकुळनाथ प्रेमचंद यांच्या निवासस्थानी स्थलांतरीत झाले.

### मदुराई आश्रमाची सुरुवात

मदुराईतील अलगरकोईल रोड वर सुंदरराजनपी येथील जागा मदुराई केंद्रातील अभ्यासी बंधूंनी एकत्र येऊन विकत घेण्याचे ठरविले. हे ठिकाण मदुराई रेल्वे स्टेशन व बस स्टॅन्ड पासून ११ कि.मी अंतरावर आहे. सन १९९२–९४ च्या दरम्यान मिशनसाठी २.८७ एकर जमीन खरेदी करण्यात आली तर उर्वरित जमीन देणगी देणाऱ्या अभ्यासींच्या नावे राखून ठेवण्यात आली. ह्या जागेचे गुरुदेवांनी "श्री रामचंद्र पूरम" असे नामकरण केले. काही कालावधीनंतर आणखी दीड एकर जमीन गुरुदेवांनी दिलेल्या अनुदानातून संपादित करण्यात आली आणि अशाऱ्हेने मिशनची एकूण जमीन २.८७ एकर वरून ४.२० एकर पर्यंत वाढली.

सन १९९५ साली, ह्या जागेवर गवताने शाकारलेल्या एका पडवीत नियमित सत्संगास प्रारंभ झाला.कालांतराने त्यावर पक्के बांधकाम करण्यात आले. गुरुदेवांनी दि. २२ सप्टेंबर १९९७ रोजी त्याचे उदघाटन झाल्याचे जाहिर केले व त्यास "मास्टर्स चेंबर" असे नाव दिले. त्याच प्रसंगी गुरुदेवांनी "साधना निलायम" या नावाने बांधण्यात येणाऱ्या ध्यान कक्षाचा शिलान्यास केला. त्यानंतर दि. १७ नोव्हेंबर २००४ रोजी गुरुदेवांनी १०८०० चौरस फ़ूटांच्या नवीन ध्यान कक्षाचे उद्घाटन केल्याचे घोषित केले. व्यासपीठावरील गुरुदेवांची सुंदर पूर्णाकृति प्रतिमा ही केवळ सर्वांच्या दृष्टिचे मुख्य आकर्षण केंद्रच नसून सर्वांसाठी ती एक मार्गदर्शक तारा ही आहे!

अर्धस्थायी स्वरुपाचे बांधकाम असलेल्या ह्या ध्यानगृहाची आसन क्षमता १५०० व्यक्तींसाठीची आहे. मणपक्कम येथील बाबूजी मेमोरिअल आश्रमातील शयन स्थानाच्या नूतनीकरणावेळी जुन्या शयन स्थानाचे उतरविलेले बांधकाम साहित्य गुरुदेवांनी या ध्यानगृहाच्या बांधकामासाठी भेट म्हणून दिले आहे.

या शिवाय एक शयन स्थान, एक उपहार गृह, एक स्वयंपाकघर, एक भोजनकक्ष, मुलांसाठी एका अभ्यासिकेसह अन्य उपक्रमांसाठी सुविधा या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. आवश्यक उपकरणांसह मुलासाठी एक खेळाचे ठिकाण व ग्रंथालय ही २००९ मध्ये स्थापन करण्यात आले आहे.

आश्रमामध्ये, गेली सहा वर्षे एस.एम.एस.एफ़. च्या निधी मधून, अभ्यासी डॉक्टर व अन्य वैद्यकीय कर्मचारी आसपासच्या खेड्यातील लोकांसाठी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी एक नि:शुल्क वैद्यकीय शिबिर आयोजीत करतात.

केंद्रातील रविवारच्या सत्संगासाठीची अभ्यासींची सरासरी उपस्थिती १९९२ मधील ६५ वरुन आज ४५० पर्यंत वाढली आहे. गुरुदेवांनी पहिल्या भेटीत येथील ओसाड जमीन पाहून आपल्या विशिष्ट पध्दतीने अभ्यासींना आज्ञा केली, "हे हिरवेगार करा". आणि आज त्यांच्या कृपेने आश्रम एका सुंदर हिरव्यागार झाडांच्या देखाव्यासारखा दिसून येत असून त्यामुळे येथील वातावरण शीतल, शांत व शुध्द झाले आहे.







**To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**

© 2011 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.